2017 - 2018.

261

Impact Factor - 3.452

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February-2018

SPECIAL ISSUE-XLVII

# मराठा समाज :

## साहित्य, संस्कृती, इतिहास आणि राजकारण



संपादक मंडळ

अतिथी संपादक :
प्राचार्या डॉ.सौ.एस.एस.घुमरे
मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक
कर्मवीर काकासाहेब वाघ कला, विज्ञान आणि वाणिज्य
महाविद्यालय, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक

कार्यकारी संपादक :
डॉ. शंकर बोऱ्हाडे
प्रा. ज्ञानोबा ढगे
प्रा. नारायण शिंदे

मुख्य संपादक : डॉ. धनराज [illegible]

This journal is indexed in :
- UGC Approved Journal List No. 40705 & 41117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

SWATIDHAN PUBLICATIONS

ISSN : 2348-7143
February 2018

# INDEX


| Sr. No. | Title of the paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | *A study of Marathi(culture) and Immigrant Female Protagonist from select Novels of Shashi Deshpande and Bharti Mukherjee* | - Prof. Sunita Borde | 07 |
| 2 | *Identity Crisis of Maratha Community in early 20th Century* | - Prof. K. L. Shinde | 10 |
| 3 | *Maratha Community and Politics in Maharashtra* | - Prof. Raviraj A.Vatne | 14 |
| 4 | *Reflection of Maratha Culture in Literature, Films and Media* | - Prof. Wagh Santosh R | 18 |
| 5 | *महाराष्ट्र के क्रांति मोर्चाओं की दिशाएँ* | प्रा. राजेंद्र व्ही. जाधव | 20 |
| 6 | *छ.शिवाजी महाराज के शासन काल में कवि भूषण का योगदान* | –प्रा. पोपट बिरारी | 22 |
| 7 | *हिंदी साहित्य में महाराष्ट्र और मराठा समाज का चित्रण* | - प्रा. सरला तुपे | 27 |
| 8 | *छ.शिवाजी महाराज के शासन काल में कवि भूषण का योगदान* | - प्रा. युवराज गातवे | 30 |
| 9 | *भूषण के काव्य में राष्ट्रीय चेतना* | -सूर्यकांत चोरघडे | 32 |
| 10 | *बहुजन चळवळीत मराठा समाजाचे योगदान* | - प्रा. पी. डी. गोणारकर | 35 |
| 11 | *मराठी साहित्यातील मराठा समाजाचे चित्रण* | - डॉ. शंकर बो-हाडे | 42 |
| 12 | *मराठा समाज आणि मराठी साहित्य* | - प्रा. निलेश आहेर | 46 |
| 13 | *मराठी साहित्य आणि चित्रपटातील मराठा समाजाच्या राजकीय प्रतिमेचे विद्रुपीकरण* | - प्रा. कैलास सलादे | 50 |
| 14 | *मराठा समाजातील स्त्रियांची सामाजिक व राजकीय स्थिती* | - डॉ.सुवर्णा गुडगे -बेनके | 53 |
| 15 | *मराठा समाजातील कर्तबगार स्त्रियांची कामगिरी* | - प्रा. सारिका गायकवाड | 56 |
| 16 | *मराठा समाज आणि महाराष्ट्रातील जात आरक्षणाचे राजकारण* | – डॉ. काकासाहेब पोकळे व अरुण काळे | 62 |
| 17 | *कुणबी मराठा आणि तीन कविता* | - इद्रीस मोमीन | 71 |
| 18 | *महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे राजकीय विचार आणि कार्य* | - प्रा. डी. टी. ढगे | 75 |
| 19 | *महाराष्ट्रातील मराठा स्त्रियांचा राजकारणातील सहभाग* | - प्रा. गणेश लिंबोळे | 79 |
| 20 | *महाराष्ट्राच्या बहुपक्षीय राजकारणात मराठा समाजाची भूमिका* | - प्रा. आर. डी. आगवाने व प्रा. व्हीं. डी. कापडी | 82 |
| 21 | *मराठा समाज आरक्षण : इतर मागासवर्गीय (OBC) राजकारणाचा पेचप्रसंग* | - अमोल तळणकर | 88 |
| 22 | *बडोदे संस्थानातील ग्रंथालय चळवळ* | - प्रां. श्रीमती पंकजा अहिरे | 90 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 47 : मराठा समाज : साहित्य, संस्कृती, इतिहास आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# मराठा समाज आणि महाराष्ट्रातील जात आरक्षणाचे राजकारण

प्रा. डॉ. काकासाहेब गंगाधर पोकळे
सहयोगी प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग,
एन.एस.एस. आर्ट्स, कला विज्ञान महाविदयालय,चौसाळा ता.जि.बीड.

अरुण शिवाजीराव काळे, पीएच.डी. संशोधक, (राज्यशास्त्र)
डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद.

प्रस्तावना :-

मराठा समाज आणि महाराष्ट्रातील राजकारणाची चर्चा महाराष्ट्र स्थापनेपासून सहकारी चळवळ,शेतकरी चळवळीपासून राजकीय निवडणूकीतील मराठा वर्चस्वा पर्यंत वेगवेगळया संदर्भाचे अनुषंगाने चालू आहे. हा विचार अलिकडच्या काळात मराठा समाज केंद्रीत संघटनानी उभारलेल्या आरक्षणाची मागणी आणि मराठा क्रांती मुक मोर्चाच्या निमित्ताने जोरकसपणे मांडण्यात येत असून मराठा समाज आणि जात केंद्रीत प्रश्न आणि राजकारणाची चर्चा होत आहे.

मराठा जात ही महाराष्ट्राच्या एकुण लोकसंख्येच्या अंदाजे 35/40 टक्के असल्याचे 1930 च्या जनगणनेच्या आधारे दावा केला जातो. हा समाज मुख्यत: ग्रामीण व शेती आधारीत व्यवसायात स्थिरावलेला आहे. विदर्भातील कुणबी, खानदेशातील लेवा पाटील, गुर्जर, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडयातील मराठा, पाटील, देशमुख आणि काही अंशाने कोकणातील खोत हे मुख्य भेद आहेत. त्याच्यात स्थानिक भौगोलिक जवळीकतेनुसार विवाह संबंध होतात. त्याच बरोबर अकरमासे खालपाखे, वरपाखे असे पोट प्रकार असून आपसात विवाह संबधाबाबत जागरुकता बाळगली जाते. त्याच्यात 96 कुळी असण्याबाबत स्वाभिमान, अहंकार असल्याचे दिसून येते. मुलत: आपले सामाजिक व आर्थिक मागासलेपणे लपविण्याकडेच मराठा समाजाचा कल राहिला आहे.

स्वातंत्र्यानंतर ज्या जात केंद्रीत हितसंबंधी गटांनी आपले हितसंबंध लोकशाही मार्गाने मांडले पुढे तेच मुद्दे राजकारणाच्या मुख्य पटलावर आले आहेत. ज्यांना जमले नाही त्याची पिच्छेहाट झालेली आहे. मराठा समाजाने जाती आधारावर लोकशाहीमध्ये मागण्या मागणे सरकार दरबारी निवेदने, निदर्शने, आंदोलने अशा मार्गाने प्रश्न सोडविण्याकडे जात म्हणून मराठा समुह अजुनही तयार नाही. शासन जात केंद्रीत संघटनास प्रतिसाद देत असताना त्यानुसार एकत्र न होणे हे त्यांच्या मागासपणाचे लक्षण आहे. त्यामुळे त्यांच्या जात वर्गीय समस्या मुर्तरुपाने आकार घेत नाहीत. जातीच्या काही समस्या आहेत. हेच पक्षीय दृष्टीकोणातून पाहिले जात नाही. मराठा समाजाचे सर्वसमावेशी स्वरुप जावून संघटीत जात केंद्रीत एकीकरण मुक मोर्चाचे रुपाने बाहेर येत आहे.त्याचे भारतीय राजकारणावर दिर्घकालीन सर्व व्यापी परिणाम होणार आहेत.

**मराठा समाज आणि जात एकीकरणाची अपरिहार्यता -**

काँग्रेस पक्षाला स्वातंत्र्य प्राप्तीचे योगदान आणि एक पक्ष व्यवस्थेमुळे सर्व क्षेत्रिय धोरणे ठरविण्याची अमर्याद स्वायत्तता मिळाली. परिणामी गेल्या 65 वर्षात सर्व क्षेत्रातील समस्या सोडविण्याकरीता आरक्षण, सवलतीच्या योजना, मंत्रालयाची रचना, आयोगांचे संघटन, महामंडळे,अर्थ संकल्पातील तरतूदी या जात व अल्पसंख्याक केंद्रीत संरचनात्मक व्यवस्थेमुळे समस्या सोडवायच्या तर त्या संस्थात्मक रचनेच्या व अधिकार क्षेत्राच्या मर्यादेत ही भूमिका तयार होवून सर्वपक्षीय अधिमान्यता मिळालेली आहे. परंतु संस्थांना असलेले जात मर्यादित अधिकार, अपुरी साधने,अनेक कारणामुळे अंगभुत असलेली अकार्यक्षमता त्यामुळे केवळ विशिष्ट जात समुहासाठीच योजना व फायदे आहेत असा समज शासन व्यवहारातूनच तयार होत आहे.

मराठा समाजाचे हिंदू चातुवर्ण्य व्यवस्थेतत नेमके कोणते स्थान आहे. याबाबत ऐतिहासिक आणि सदयकालीन सामाजिक पातळीवर मतभेद आहेत. ऐतिहासिक दृष्टया तो शुद्र आहे अशी मांडणी केली जाते, तर गाव पातळीवर निर्णय प्रक्रीयेत आणि स्वातंत्र्यानंतरही राज्यव्यवस्थेत तो लोकशाही प्रक्रीयेचा अपरिहार्य भाग असल्याने बहुसंख्यांक म्हणून सर्वोच्च स्थानी दिसून येत असल्याने वर्चस्वशाली जात म्हणून त्याच्याकडे पाहण्यात येते. मराठा ही एकजिन्सी वाटणा-या जातीची ओळख गेल्या पन्नास वर्षातील राजकीय कारणांनी विकसीत झालेली आहे. मुळात छत्रपतीपासून ते राजर्षी शाहू पर्यंत त्यांनी स्वत:ची ओळख केवळ 'मराठा जात' असल्याची केलेली नाही. मराठा नावाने वेगवेगळे वृतपत्रे शिक्षण संस्था वेगवेगळया जात समुदायाकडून स्थापल्या जात होत्या. त्यावेळी त्यांच्याकडे जातवादी दृष्टीकोणातून पाहिले गेले नाही. शासनाने सामाजिक मागामाची व्याख्या हिंदू चातुवर्ण्य व्यवस्थेतील ब्राम्हण,क्षत्रिय वैश्य,शुद्र, अस्पृश्य अशी करुन त्या आधारे लाभाचे प्रमाण ठरविण्यात आलेले नाही. तर केवळ जात केंद्रीत लाभ देण्याची व्यवस्था निर्माण केल्यानंतर प्रथम मागास जाती एकीकरणाला चालना मिळाली. अशा लाभाची व्याप्ती वाढत गेली. तसेच असे लाभ आपणासही मिळावे या करीता अमागास जाती एकीकरणास चालना मिळाली आहे.

काँग्रेसने केंद्रीय पातळीपासून जात आधारीत राजकारण करताना त्याच्या राजकीय मुल्याची जाणिव होती. अनुसुचित जाती व जनजाती यांना आरक्षण-सवलती तसेच गरीबांना दारिद्रय रेषेखालचे काही लाभ देवून समाधान करण्याचा प्रयत्न केला गेला. आरक्षणाच्या कक्षेबाहेरील मराठा समाज बहुसंख्याक गरीब व शोषित असला तरी पोट प्रकार आणि रोटी बेटी व्यवहारात बंदिस्त आहे. त्यामुळे लोकशाही मार्गाने संघटीतपणे मागण्या करणे त्याला शक्य झालेले नाही. तसेच स्वत:ला मागावे तर सरंजामी आत्मसन्मानाला धक्का बसतो, यातून काँग्रेसला निर्विवाद सत्ता उपभोगता आली.

मागास जाती व अल्पसंख्याकांचे कल्याण याबाबत असलेल्या घटनात्मक चौकटीत लाभ देण्याचा निर्णय घेतले गेले तर पुढारलेल्या व बहुसंख्याक जातीचे राजकीय,प्रशासकीय नेतृत्व असल्याने त्यांचे भले होणारच आहे. त्यामुळे त्यासाठी वेगळे काही करण्याची आवश्यकता नाही. ही धारणा काँग्रेसच्या एक पक्ष व्यवस्थेमुळे दिर्घकाळ टिकून राहिली आहे. ही राजकीय कोंडी फोडण्याकरीता बिहार 1977-80 मध्ये आरक्षण विरोधी आंदोलन झाले 1981 मध्ये गुजरात जात भूमिकेवरुन परिवर्तनवादी दाव्यांना आव्हाने दिली जात होती, परंतु अभ्यासकांनी विश्लेषण न करता त्याची निंदा केली. जनता सरकारने 1979 मध्ये मंडल आयोगाची कार्यकक्षा घटनात्मक तरतूद व जातनिहाय सुधारणा या मर्यादित सुचविण्यापर्यंत होते. यातून इतर मागास वर्गाचे (OBC) सुत्र मांडले व त्यात तीन हजार जातींना आरक्षणात तरतूद केली. मुळ आरक्षण धोरणातील विसंगती दुर न करता आरक्षणाची व्याप्ती वाढविल्याने आरक्षण विरोधाची धार बोथट करुन टाकण्याचे सुत्र विकसीत केले गेले. परिवर्तनाचे राजकारण करु पाहणा-या जनता सरकारने आपले धोरणातून आपण ज्याचे प्रतिनिधीत्व करतो त्यावर्गात अंतर्विरोध निर्माण करुन परीवर्तनाचे आकाश मर्यादीत केलेले आहे. अराखीव प्रवर्गातील जातींना आपण संधीची किमान सुरक्षितता देवू शकलो नाही. यामुळे जनतेचा मुखभंग होवून जनआदोंलने होत आहेत. तसेच जातीच्या बाहेर येवून अराखीव प्रवर्गाचे प्रतिनिधीत्व किंवा त्या आधारे संघटीत होवून जात आरक्षण मागणी करणे प्रस्थापित चौकटीत शक्य नसल्याने बहुसंख्याक समुदाय जात निहाय सवलती,आरक्षणाची मागणी करण्यास मजबूर झालेला आहेत. त्यामुळे जातीच्या आधारावर संघटीत झाल्याशिवाय पर्याय नाही. परिणामी भारतातील सर्वच बहुसंख्याक जाती ही जात आधारावरच संघटीत होण्याचा पर्याय निवडत आहेत. परंतु त्याच्या मागण्याकडे समस्या सोडविण्याचे अंगाने पाहण्याऐवजी त्यांना सरसकट जातीयवादी ठरविण्याचे संभाव्य धोके विचारात घेतले जात नाहीत.

सामाजिक वास्तवाकडे निव्वळ जात घटकाच्या आधारे पाहिल्यामुळे प्रचंड विसंगती निर्माण होतात. व्यापक विसंगतीवर काय धोरण असावे याबाबत मौन पाळले जाते. जात आरक्षणातून जातीचा संबंध तुटत नाही. सामाजिक विकासाची मांडणी जात निहाय ठरविण्यातून जातीव्यवस्था टिकवली जात आहे. त्यामुळे बहुसंख्याक जातीतील गरीबांना सर्व सवलतीमधून वगळण्यात येत आहे. ही वस्तुस्थिती पाहून मराठा समाज अस्वस्थ झालेला आहे. त्यामुळे जात भूमिका घेवून भौतीक हितसंबंध जोपासले की मुख्यमंत्री कोणत्या का जातीचा होईना हितसंबंध सुरक्षित कसे होतात याची त्यांना अलिकडे चिंता वाटू लागली आहे.निव्वळ राजकारणावरील लक्ष व्यवहारीक हितसंबंध सुरक्षित ठेवण्याकडे संक्रमीत होवून जातीच्या समस्याची सोडवणूक परिणामकारक होईल ही धारणा मराठा समाजात वाढीस लागली आहे.

आरक्षण सवलतीकरीता सरसकट जातीला मागास ठरविल्यामुळे नव्या आत्मसन्मानाच्या शोधाच्या गरजेतून हिंदूभान जागृत होवून स्वजातीचे अल्पसंख्यत्व आणि मागासपणाची ओळख नाहीशी करुन बहुसंख्याक प्रवाहात सामिल होण्याची संधी भाजपा शिवसेना व तत्सम पक्षांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यांना हिंदू समाज ही ओळख अधिक जवळची व राजकीय विकासास पोषक ठरण्याची आशा वाटते. ती जाती आधारीत शासकीय धोरणांचा परीपाक आहे. ही प्रक्रीया सर्वसमावेशक न होता बहुसंख्याक जातीतील शोषितांचे हिताकडे दुर्लक्ष करण्याच्या परीणामी त्यांच्यातील जाती आधारीत अधिक कडवेपणाने एकत्र येवून महामोर्चे व हिंसक आदोंलनातून या व्यवस्थेला नकारात्मक प्रतिसाद देत आहेत. यास प्रतिकार म्हणून इतर मागास जात वर्गाचे संघटन करुन बहुसंख्याकांचे संघटनास विरोध करण्याचे सुत्र विकसित होत आहे. परिणामी जाती अंताची शक्यता नष्ट होत आहे.

मराठा जातीमध्ये सरंजामीवृत्ती आहे किंवा संख्येने जास्त समुदाय आहे याची शिक्षा म्हणून त्यातील गरीबांना आरक्षण व तस्तम सवलती दयावयाच्या नाहीत अशी भूमीका घेणे म्हणजे त्यांच्या गुणदोषांना ठेचून मारल्या सारखेच आहे. सरंजामी व्यवस्थेची मुल्य आपली मानणा-या आर्थीक दारिद्रयात जगणा-या जातींना लोकशाहीकरण करण्यासाठी विकासाच्या संधी मारुन सरळ करणे शक्य नाही. धर्म असो की जात नव्या आणि अधिक परिणामकारक मुल्याची स्थापना केल्याशिवाय जुनी मुल्य कोणताही समाज टाकून देणार नाही. हे वास्तव नाकारले जात आहे. मंडलोत्तर काळापासून मध्यम जातीची पुर्नमांडणी होवून भौत्तीक हितसंबंधाची स्पष्टता येत असताना बहुसंख्यांक जातीतील गरीब,मध्यम कनिष्ठ वर्गाला जबरीने श्रेष्ठ वर्ग गृहीत धरण्याचा परिणाम त्यांच्या शोषणात होत आहे. त्यांच्या हिताचे समाधान न झाल्याने बहुसंख्याक जातीमध्ये देश विभक्त होत आहे. सर्व मराठा जातीच्या परंपरा,चालीरिती या एक सारख्या नाहीत त्यांचे आता कुणवी करा किंवा इतर काही संबोधन करा मग तुम्हाला आरक्षण मिळेल असा शब्दछल करुन त्याची निर्माण झालेली ओळख पुसुन मागास असल्याचे मान्य करा असे सुचविले जात आहे. कुणबी जात जो व्यवसाय करते त्याचे साधर्म असलेले मराठवाडयातील कुणबी कोण आहेत हे आयोगाने निश्चित करणे आवश्यक आहे. याकरीता आरक्षण नाकारणे म्हणजे एक एक जात हीच उपराष्ट्रासारखी असण्याची अपेक्षा करणे किती धोकादायक आहे हे लक्षात येईल. या आग्रहामुळे मराठा समाजात अधिक कडवेपणा व एकीकरणाची प्रक्रीया वेगाने घडत आहे.

मागास असो की अमागास प्रत्येक जातीतील संपन्न गटाचे निर्णय प्रक्रीयेवर नियंत्रण असते आणि आपल्या स्थानाला मोठा धक्का बसेल असे धोरणात्मक निर्णय ते घेतील अशी शक्यता अजिबात नसते. संपन्न असलेल्या गटाचे भरोसावर विषमता व दारिद्रयग्रस्त लोकांना सोडून दिलेले आहे. वेगवेगळया आर्थिक स्तरातील मराठयांचे हितसंबंध जोपासणे सर्व समावेशी नेतृत्वाला शक्य राहिले नाही. या मतभेदातून काँग्रेस ऐवजी वेगवेगळया पक्षात मराठयांच्या प्रवेश होवू लागला आहे.

मराठा समाज इतर मागास जातींप्रमाणे अगोदर इतर मागास प्रवर्गामध्ये प्रवेश करुन मग हिंदू आत्मभान येण्याची प्रक्रीया घडण्याऐवजी निजामी राजवटीच्या पार्श्वभूमीवर मराठा जातीचे क्षत्रिय भान जागे करुन मराठवाडयात शिवसेनेने जोरदार मुसंडी मारली. 1992 साली बाबरी मशिद, विदयापिठ नामांतरास सर्वात जास्त विरोध शिवसेनेने केला. शिवसेना ही खरेतर प्रस्थापित मराठा नेतृत्वाच्या विरोधात असूनही मराठवाडयात शिवसेनेला मराठयांनी जोरदार पाठिंबा दिलेला आहे. त्यामुळे मराठयांना सरंजामी व्यवस्थेतून थेट आक्रमक व काहीशी लोकशाही विरोधी प्रवृत्ती जागृह करण्याचा प्रयत्न होत आहे. तुलनेने विदर्भातील कुणबी-मराठा जातीचा इमावतील प्रवेशाने त्यांचेत क्षत्रिय, लढावू बाण्यापेक्षा सर्वसमावेशक हिंदू समुहभान जागृह झाले आहे. तेथे मराठवाडयाचे तुलनेने संरजामी कडवटपणाचे वर्तन व्यापक स्वरुपात दिसून येत नाही. या अर्थाने एक मोठा जात समुह लोकशाही प्रक्रीयेपासून वंचित ठेवण्यात आला आहे. मराठा मुक मोर्चाची सुरुवात औरंगाबाद येथूनच झालेली आहे हे विशेष नमूद करण्यासारखे आहे. त्यामुळे भविष्यात आरक्षणाच्या मुदयावर तो जाट समुहाचे अनुकरण करु शकतो.

**मागास जात आरक्षणाकडून बंदिस्थ जात व्यवस्थेकडील प्रवास आणि मराठा आरक्षणाचे राजकारण**

जात ही नैसर्गिक आणि कालातीत नाही विकासाच्या वाटेवर स्तरीकरण, विषमता, आर्थीक स्पर्धा वाढली असून ती सर्व जातीय आहे हे विचारात घेतले जात नाही. स्वातंत्र्यानंतर परीवर्तनाच्या वाटेवर त्यामध्ये लवचिकता येवून आर्थीक स्तरात चढउतार होणारच हे आपण आरक्षण धोरणातून शिकण्यास तयार नाहीत. कोणत्याही जातीत किंवा समान समुह भान असलेल्या गटात विकासाची प्रक्रीया सुरु झाल्यानंतर ज्यांना लाभ होतो. त्यांना आरक्षणाच्या कोटयातून वगळणे, प्रचलित आरक्षण समर्थनांत मागास जात प्रवर्गातील एकदा ही आरक्षणाचा फायदा मिळाला नाही त्यांचे पर्यंत आरक्षण व सवलती कसे पोहचणार याचे उत्तर प्रचलित आरक्षण व्यवस्था देत नाही. जात आरक्षण व्यक्तीला मागासलेपण त्यागायचे असते ते जन्मभर मिरवायचे नसते असा वस्तुपाठ घालून देत नाही. आरक्षणाचा विशिष्ट लाभार्थीक गट तयार झालेला असून त्यांना लाभ मिळाल्यानंतर राहीलेला भाग गरीबापर्यंत पोहचणार त्यांनी त्यावर समाधान मानावे असा मेकॉलेचा झिरपणीचा सिंध्दात काम करत आहे.

राजकीय व्यवस्थेकडून जातीमुळे भौतिक लाभ होतात म्हणून काही जाती हया जातीय आधारावर संघटीत होतात आणि ज्यांना फायदे होत नाहीत ते मिळविण्याकरीता जातीय आधारावरच संघटीत होतात.आणि या दोघांची ही आर्थीक प्रगती झाली की त्यांचे हिंदूभान तयार होते. भाजपाने जात राजकारणाला हिंदू राजकारण हा पर्याय दिलेला आहे. काँग्रेसने राबविलेल्या धोरणाचे परिणामी निर्माण झालेली पोकळी भाजपाने भरून काढली. सरधोपटपणे भाजपाला वाईट व धोकादायक मानल्यामुळे सर्व कनिष्ठ जात वर्गाचे हिंदूकरण घडून येत आहे. आज परिवर्तनवादयांकडे धोरणातील,योजनातील जात व धर्मनिरपेक्ष अंमलबजावणी करुन जातीविहीन समाज निर्मितीचे व्यापक धोरण अस्तित्वात नाही. परीवर्तनाची व्याख्या सर्वसमावेशक नसल्यामुळे उच्चवर्णीय व बहुसंख्याक असलेल्या जातींच्या आर्थीक स्तरानुसार समावून घेण्याचा मार्गच परिवर्तनवादयाकडे उपलब्ध नाही.

म.फुले,राजर्षी शाहू, डॉ.आंबेडकर यांच्या चळवळीत जात विरोध व समता प्रस्थापित करणे हे ध्येय आहे. परंतु आरक्षणाचे तत्व सामाजिक न्यायाच्या तत्वाशी जोडून जातींना त्यांवर कायम हक्क दाखविला जात आहे. बंदिस्त जात आरक्षण ही कायम स्वरुपी तरतुद म्हणून अराखीव जातींना सर्वकाळ मान्य होण्यासारखे नाही. सामाजिक मागासपणा हा मागास जातीचा स्थायीभाव नाही. त्यामुळे ते कायम राहिले पाहिजे असे

समर्थन मान्य होवू शकत नाही. आरक्षणाची व्याप्ती वाढविताना त्यातील विसंगती दुर करण्याची राजकीय इच्छा शक्ती शासनास दाखविता आलेली नाही. त्यामुळे घटनात्मक तरतूदी,संस्थात्मक संरचना व जातीय दबाव आरक्षणाला अधिक व्यापक न्यायाच्या भुमिकेतून पुढे येवू देत नाही स्वातंत्र्यानंतर शिक्षण घेवून जाती आधारीत आरक्षणातून संधी मिळू लागल्याने उच्च मध्यमवर्गीय जाती आधारीत संघटन झाले तरी त्याकडे सामाजिक न्यायासाठी कृती म्हणून पाहिले जाते. तर बहुसंख्याक जातीतील मागासाला या समताधिष्ठीत समाजात कोणतेही स्थान राहिले नाही.

फुले शाहू आंबेडकरी पंरपरेशी वारसा सांगणारे केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर आणि एन डी पाटील या शेतकरी कामगार पक्षाचे मराठा नेतृत्त्व लोकशाही सत्ताकारणात अपयशी झालेले आहे. तसेच ही परिवर्तनवादी चळवळ जात आरक्षणाच्या राजकारणात अडकून सिमीत झालेली आहे. त्यामुळे दलित चळवळीस मराठा,कुणबी,शेतकरी आपला वाटला नाही. मराठा जात समुहाला सामावून घेण्यात कमी पडली. मराठा सेवा संघासारख्या जात समुहाच्या संघटनानी मागील 20/25 वर्षापासून जाणिवपूर्वक सातत्याने फुले शाहू आंबेडकरी चळवळीत स्वत:चे अस्तित्व शोधण्याचा जोरकस प्रयत्न करत आहे. भारतात जाट व पटेल किंवा कोणताही समुदाय फुले शाहु आंबेडकर किंवा परीवर्तनवादी म्हणावे अशा कोणत्याहि चळवळीशी नाते सांगत नाही. त्यामुळे त्यांचे हिंदूकरण करणे भाजपाला सहज शक्य झालेले आहे. मराठा समाजाने मात्र इतिहासाचा नव्याने अन्वयार्थ लावून फुले शाहू आंबेडकरी चळवळीतच आपला अवकाश शोधण्याच्या प्रयत्नातून मराठा आरक्षणाचे मागणीने जन्म घेतलेला आहे.त्यावर जो पर्यंत योग्य उपाय योजना केली जात नाही तो पर्यंत हा विषय महाराष्ट्राच्या राजकारणाचा केंद्रबिंदू राहणार आहे.

**मराठा आरक्षण आणि मराठा सर्वसमावेशी नेतृत्वापुढील आव्हाने -**

मराठा नेतृत्वाला बहुसंख्यांक मराठा जातीचे मते तर आपसुक मिळत होती. कनिष्ठ व अल्पसंख्याक जाती हया अधिक एकजिन्सीपणाने वर्तन करतात. काँग्रेस पक्षाला एकगठ्ठा मते मिळण्यासाठी आपण त्यांच्यासाठी काय-काय करु शकतो हे दाखवता येत असल्यामुळे मराठा जात नेतृत्वाला सर्वसमावेशकता मिळत होती. परंतु मराठा समाजाचा विचार न केल्याने त्यांच्या नेतृत्वाला मोडीत काढून निव्वळ जात केंद्रीत संघटनास बळ मिळून आजच्या जात व्यवस्थेत मराठा जातीची झालेली कोंडी फोडण्यासाठी प्रयत्न होत आहेत. बहुसंख्याक मराठा जातीतील गरीबावर अन्यायकारक व्यवस्था असल्याने त्यांच्यात मांघिक भावना वाढीस लागली आहे.

मराठा समाजातून आलेले सर्वसमावेशक नेतृत्वाचे प्रतिनिधत्वाचे दावे वादग्रस्त होणे ही बाब जशी कनिष्ठ जातीच्या एकीकरणासाठी पोषक ठरली तसेच बहुसंख्यांक जातीच्या एकीकरणासाठी ही ठरलेली आहे. मागास प्रवर्गातील जाती जात दृष्टीकोण सोडून प्रवर्गाच्या नात्याने मागण्या न करता जाती केंद्रीत मागण्या करतात. तो दृष्टीकोण स्विकृत करुन प्रोत्साहन दिले जाते. आरक्षण हे मागणी करताना जातीनुसार मागावे लागते परंतु शासनाकडून देताना मात्र ते प्रवर्गानुसार दिले जाते. मात्र बहुसंख्याक असलेली मराठा जात संघटीत झाली की जातीयवाद वाढला अशी सोईस्कर भूमिका बदलली जाते. मुळात संघटीत होवू शकणे ही घटनाच प्रश्नाचे गांभीर्य दर्शवितो याकडे दुर्लक्ष केले जाते. जातीच्या समस्यावर खुलेपणाने मांडणी होत नाही. शेती केंद्रीत असलेला समाज आणि त्याचे विस्कळीत अर्थकारण तसेच रोजगार व नोक-या शिक्षणाच्या संधी यातील अभावामुळे मराठा समाजात असंतोष आहे. तो सर्वसमावेशक नेतृत्वाखाली एकत्रीत होण्याऐवजी जात आधारीत संघटीत होवून मोर्चाच्या रुपाने व्यक्त होत आहे. त्यामुळे सर्वसमावेशक नेतृत्वाचे दावे वादग्रस्त होवून कधीही मराठा जात केंद्रीत भूमीका न घेतलेल्या नेतृत्वाकडे ही मराठा नेतृत्व याच भावनेने इतर जाती समुह

पाहू लागले आहेत. मराठा जातीची आरक्षणाची मागणी व मताच्या राजकारणावर प्रभाव पाडण्याची क्षमता त्यामुळे आरक्षणाचा मुद्दा हा पुढील काळात ठोकदार राहणार आहे.

मराठा समाजात स्वातंत्र्यानंतर जमीनदार व प्रतिष्ठीत उच्च जातीय कुटुंबिय,घराणे असलेल्या त्यांच्याच जातीतील लोक कनिष्ठ आर्थीकस्तर असलेला एकच असल्याचे गृहित धरले जाते. गरीब मराठयावर त्यांच्याच जातीतील श्रीमंत मराठयांनी अन्याय केल्याची मांडणी केल्या जाते.परंतु ही मांडणी जातीयवादी आहे. मराठा वर्चस्व असलेल्या शिक्षण संस्था व मंडळे यामध्ये शासनाने घालून दिलेल्या नियमानुसार काम करावे लागते. तसेच ही मांडणी मराठा जातीतील गरीबाचे कल्याण करण्याची जबाबदारी त्यांच्याच जातीतील श्रीमंत मराठयांनी निभवावी असे गृहीत धरणे म्हणजे श्रीमंत मराठयांनी जातीयवाद करावा. तसेच गरीब मराठयांनी जातीच्या नावाने संघटीत होवून श्रीमंत मराठया बरोबरच राहावे असे सुचविले जाते. याचा अर्थ शाहू महाराजानींही केवळ जातीय भुमिकेतून मराठयांनाच वसतीगृहे,सवलती व आरक्षण लागू करावे.यशवतराव चव्हाणांनी मुख्यमंत्री म्हणून केवळ मराठा हितसंबंध जोपासले पाहिजे होते असे सुचविल्या सारखेच आहे.

**प्रतिनिधीत्वाचा दावा आणि सामाजिक मागास आरक्षण धोरणातील विसंगती वरील उपाय योजनेचा अभाव -**

हितसंबंधी लोकशाही व्यवहाराची दृष्टी वैश्विक नसते. आपल्या समूहाच्या हितावर सत्तेतील वाटयावर त्यांचा व्यवहार बेतलेला असतो. इतिहासातील सामाजिक शोषणाची भरपाई म्हणून आरक्षण व सवलती या तरतूदी आहेत. सामाजिक प्रक्रीयांना स्वत:ची गती असते तसेच दबा धरून बसलेल्या प्रक्रीया संधी मिळताच त्या गतीशिल बनतात आरक्षण गरीबी निर्मुलनाचा कार्यक्रम नाही. मागासास प्रतिनिधत्व आणि सत्तेतील वाटा मिळण्याचा प्रश्न आहे. अशी भुमिका घेतली जाते राज्य घटनेत आरक्षणास सामाजिक मागासपणाचा आधार आहे. परंतु सामाजिक मागासपणा कधी संपणार आहे. आणि तो संपला आहे हे मोजण्याचे एकक काय असावे. याची मांडणी केली जात नाही.आरक्षणाचा मुदद्दा केवळ सामाजिक झाल्यामुळे या माध्यमातून आर्थिक उन्नती होत आहे किंवा नाही. गेल्या 65 वर्षात उच्चवर्णीय म्हणून घेणा-या जाती कनिष्ठ जातीशी किमान सामाजिक व्यवहार तरी समतेने करण्याचा विकास झालेला आहे किंवा नाही. जर असेल तर त्या प्रमाणात आरक्षण कमी/जास्त करण्याची कोणतीच सोय प्रचलित आरक्षण तत्वात नाही. मागास जातीतील कोणाचाच सामाजिक मागासपणा कधीच संपणार नसेल तर आरक्षणाचे प्रासंगिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होतो. मागास जातींना लोकसंख्येपेक्षा जास्त प्रतिनिधीत्व मिळत असेल तर त्याला मर्यादा घालण्याची कोणतीही सोय नाही तसेच बहुसंख्याक जातींना लोकसंख्येचे प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळत नसेल तर ते मिळण्याची कोणतीही तरतूद नाही.

सन 1950 पासून केंद्र शासनात नोक-याकरीता एससी 15 टक्के व एसटी 7.50 टक्के आरक्षण लोकसंख्येच्या प्रमाणात देण्यात आलेले आहे. तो शास्त्रशुध्द निकष मानला पाहिजे. परंतु सन 1990 मध्ये 52 टक्के ओबीसी समाजाकरीता 27 टक्के आरक्षण लागू करण्यात आलेले आहे हा भेदभाव आहे. त्यांमुळे आरक्षण जात प्रवर्गानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात दिले पाहिजे. किंवा एससी,एसटी यांचा आरक्षणाचा कोटा ओबीसी प्रमाणेच लोकसंख्येच्या 50 टक्के केला पाहिजे परंतु हा भेदभाव कशामुळे याचे उत्तर प्रचलित आरक्षण धोरणात नाही.

प्रत्येक जात प्रवर्गात काही मागास जातींची मक्तेदारी आहे. काही मागास जातींना विशिष्ट प्रवर्गात राहून ही त्याचा त्यांना फायदा होत नाही. सर्व जातींना समान न्याय मिळत नाही. एवढेच नाही तर एकाच जातीमध्ये ही नव्याने जागृत झालेले समाजघटक थोडी भौतिक स्थिरता प्राप्त होताच आपण जनतेचे प्रतिनिधी

असल्याचा दावा करतात व मिळणारे फायदे आपल्याच समाजघटक जातीत खाल पर्यंत पोहचू देण्यात अडथळे आणतात. मागास जातीतील गरीबांना त्यांचे भरवशावर सोडायचे जात आहे. प्रतिनिधीत्वाच्या नावाखाली सपंन्न व शिक्षीतांना जातीयवादी घडविण्याचा प्रकार घडत आहे.अशा व्यक्तींना त्याच्या गुणापेक्षा त्यांच्या जातीचे, मागासांचे प्रतिनिधीत्व करण्याची अपेक्षा करणे म्हणजे अमागास जांतींची जाती अतांच्या जबाबदारीतून मुक्तता होते. त्यामुळे मागास जातीच्या आधारावर प्रतिनिधीत्वाचा दावा करणे हे पुरोगामी तत्व राहीलेले नाही.

मागास प्रवर्गातील शासकीय कर्मचा-यास आरक्षणाचा कोटा पदोन्नतीच्या प्रत्येक टप्प्यावर वाढत जावून प्रत्यक्षातील अमंजबजावणीत लोकसंख्येपेक्षा जास्त आरक्षणाचा कोटा होत आहे. अमागास जाती वेगाने वाहेर पडत आहेत. पदोन्नतीतील आरक्षण अनेकदा न्यायालयाने नाकारले तरी ओव्हर रुल करुन ही तरतूद राबविण्यात येत आहे. आरक्षणाचा कोटा सध्याचे मागास प्रवर्गास पुरक कसा वाढवता येईल.हाच प्राधान्याचा विषय राहिलेला आहे. अराखीव प्रवर्गाच्या कोणता ही दबाव गट नसल्यामुळे त्याच्यावर होणा-या विपरीत परीणामाची चिंता शासनाने केलेली नाही.

इतर मागास वर्ग आयोगाने आरक्षण देण्याकरीता ठरविण्यात आलेले निकषाचे आधारे सध्या ज्या जातींना आरक्षण मिळते त्यांची पुन्हा नव्याने तपासणी केली तर.अनेक जाती आरक्षणाच्या बाहेर पडतील परंतु अशी कोणी मागणी करत नसल्याने त्यांना आरक्षण व सवलती संतत चालू राहतात. आरक्षणाचा कोटा वाढत गेला असून अराखीव जागाचा संकोच होत गेला आहे. बहुख्यांक जात म्हणून मराठा,जाट,पटेल यांना संविधान बदल,सर्व जातीय सर्वेक्षण अशा निकषाच्या कठीण परीक्षातून जाण्याचा पर्याय दिला जात आहे. परिणामी सर्वच अराखीव असलेल्या जातीमधील अस्वस्थता वाढली आहे.मराठा व इतर बहुसंख्याक जाती व अराखीव सर्व जाती यांच्या आरक्षण व इतर सवलतीकरीता रास्तपणे तोडगा काढणे आवश्यक आहे.

**ब्राम्हण-मराठा-दलित संघर्ष आणि मराठा समाज राजकारणाची दिशा -**

मराठा आणि ब्राम्हण वादाला अनेक ऐतिहासिक पदर आहेत. स्वातंत्र्यानंतर वहुसंख्याक जात आणि लोकशाही प्रक्रीयेचा अटळ परिणाम म्हणून मराठा नेतृत्व राजकीय केंद्रस्थानी आले तर ब्राम्हणांचे नेतृत्व तुलनेने दुय्यम प्रशासकीय पदावर वर्चस्व स्थानी आले यातून या दोन जातीमध्ये स्पर्धा निर्माण झाली. तसेच दोन्ही जातींना परस्परावलंबित्व आले. यातून वांरवार वाद उपस्थित केले गेले. यशवंतराव मुख्यमंत्री झाले त्यावेळी हे राज्य मराठयांचे अशी संभावना,साहित्य संमेलनात राजकीय नेते कशासाठी असे प्रश्न उपस्थित केले गेले तसेच नाटके,चित्रपट,कथा यातून मराठा समाजाची जुलमी व ऐयाशी प्रतिमा उभी केली गेली. मराठा समाजाला सशक्त वैचारीक मांडणीच्या अभावातून काळानुरुप बदलता आले नाही त्यामुळे आर्थिक क्षेत्रातील पिच्छेहाट एकूणच ग्रामिण जीवनाची वाताहत झाल्याने आपल्या या अवस्थेस मनुवादी व्यवस्था व ब्राम्हणी विचार कारणीभूत आहेत. हा विचार परिवर्तनवादी चळवळीच्या विचाराच्या निष्कर्षातून पुढे आल्याने हा संघर्ष टोकदार झाला आहे.

आज आर्थिक परिस्थितीत बदल झाल्यानंतर ब्राह्मण द्वेष कमी करुन दलित व ब्राम्हण यांच्यात समन्वयाचे पर्व सुरु झाले आहे. भाजपा व शिवसेना यांचे सोवत शिवशक्ती-भिमशक्ती एकत्र आल्या आहेत. उत्तरप्रदेशात बसपाने सामाजिक अभियांत्रिकीचा प्रयोग करुन सत्ता काबीज केली होती.दलित चळवळीतून समाजाची सामाजिक घडण बदलाची तिला परीवर्तनाची दिशा दयावी ही कामे थांबलेली आहे. नरेंद्र दाभोळकर समाजाची धारणा विवेकावर करु पाहणारे ब्राम्हण ब्राम्हणी विचाराचा बळी ठरतो. शरद पवार

यांनी भाजपा /शिवसेना बरोबर जावू नये अशी कळकळ व्यक्त करुन ते कसे बहूजनवादी नेते आहेत असे भलावन करण्यात येते. मराठा समाज हे वास्तव समजून राजकारणाची दिशा ठरविण्याचा प्रयत्न करत आहे.

ब्राम्हणी इतिहासकारानी इतिहासाचे विकृतीकरण केवळ मराठा जातीच्या इतिहासाचे केलेले नव्हते तर ते सर्व क्षेत्रीय सर्व व्यापी व सर्व समाजाचे होते परंतु परिवर्तनवादयांनी विकृतीकरण दुरुस्त करण्याची सर्व जबाबदारी मराठा समाजावर टाकून ब्राम्हण-मराठा संघर्षाकरीता त्याचा फायदा करुन घेतला आहे. मात्र त्यांना आरक्षणाच्या हक्क किंवा शोषणातून मुक्ती कशी दयावी याचा मार्ग शोधला नाही. तर ब्राम्हणी विचारसरणीकडून भिमा कोरेगाव मधील व अशा प्रकरणातून दलित-मराठा असा वाद पेटविण्याकरीता कडवा मराठा-ब्राम्हण एकत्र येण्याचा प्रकार घडत आहेत. मात्र उच्च वर्गीयत्वाचे फायदे ब्राम्हणापुरते मर्यादित ठेवून क्षत्रियत्वाचे नावाने लढण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली जात आहे. परिणामी मराठा समाज दोन परस्पर विरोधी विचारसरणीत विभाजीत होवून मराठा जात उग्र धर्मरक्षक स्वरुपात पुढे येण्याचा धोका वाढला आहे.मुक मोर्चातुन मंथनातून याची उत्तरे शोधण्याची प्रक्रिया चालू आहे.

**समारोप-**


जातीय सवलती व आरक्षणातून पुन्हा जात व्यवस्थेकडे पलायन होत असल्यामुळे जातीचे भारतीयकरण होत नाही. व्यक्तीचे आत्मप्रतिष्ठा,आत्मसन्मान यापेक्षा जातवर्गीय फायदे पदरात पाडण्याकडे कल असतो व तो राष्ट्र निर्मीतीमधील अडथळा ठरतो. मागास ठरविण्याच्या स्पर्धेने कनिष्ठ जातीय ते टिकविण्याचा प्रयत्न करु लागले तर जातीबाबत तक्रारच राहणार नाही. मग जात उच्चाटन करणार कोण आणि कशासाठी ? जात नेतृत्वाचे आकर्षण वहुसंख्याक जातीत वाढत आहे. मागास जाती विरुध्द अमागास जाती असा संघर्षाच्या दारात आपण उभे आहोत. या जातीना आरक्षण दयायचे नसेल तर ते का नाही हे रास्तपणे शासनाने सांगावे लागेल. जातीचा अभिमान बाजूला ठेवून भौतिक आधारावर समाजास संघटीत कसे करावे हा प्रश्न आहे. म्हणून जातीचा विचार करताना आजच्या काळात, वास्तव विचारात घेणे आवश्यक आहे.

सोशिलअल मिडीयाच्या युगात स्मार्ट मोबाईल फोन,इंटरनेटचे दर परवडतील इतके माफक झालेले आहेत. त्यामुळे व्हॉटसअप फेसबुक अशा प्रकारांकडे आजपर्यंत उथळपणाने पाहिले गेले आहे तेच साधन आपल्या समस्या नेमक्या कशामुळे आहेत. याचे उत्तर शोधन्याकरीता विचार वहनाची प्रचंड खळबळ समाजात चालू आहे. व्यक्तीच्या जाणिवा हितसंबंधाची ओळख ठसठसीत बनवत आहेत. या प्रकारावर कोणाचेही एक हाती नियंत्रण नसले तरी ज्या घटकामध्ये प्रचंड रोष आहे असा विचार पोष्ट केल्यानंतर तो प्रचंड वेगाने समाजात पसरत असून समाजधारणेत महत्वाची भुमिका घेत आहे. तो समाजात उद्रेक घडवून आणण्याची कामगीरी करु शकतो. शासनानेही याला योग्य प्रतिसाद देत तत्कालीन हितसंबध् बाजूला सारुन शासकीय धोरणे व योजना यामध्ये जात, धर्म निरपेक्षता व निपक्षपातीपणा येणे करीता एक सुत्र ठरविणे आवश्यक आहे. मराठा समाजाचा आरक्षणात समावेशाचा प्रश्न त्यामुळेच गांभीर्याने बघण्याची आवश्यकता आहे. अन्यथा आरक्षणाचे सामाजिक न्यायाचे सुत्र म्हणून कालबाहय झाल्याशिवाय राहणार नाही.

संदर्भ सूची:-

- Basu Durga Das, Introduction India 'Wadhawa and Company',New Delhi, 2000
- Subhash C. Kashyap, Perspectives on the Constitution,Shipra Publictions Delhi.1993

- Sirsikar V.M., 'Politics of Modern Maharashtra', Orient Longman Ltd. Mumbai, 38, 1995
- महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,विभागीय सांख्यिकी दिनांक 07.12.2016 (www.maharashtra.gov.in)
- सुहास पळशीकर, समकालीन भारतीय राजकारण,प्रतिमा प्रकाशन 02.10.2004
- अर्थ व सांख्यिकी संचालनालय,नियोजन विभाग,महाराष्ट्र शासन मुंबई,महाराष्ट्र आर्थीक पाहणी 2014-2015
- मंडल आयोग अहवाल.
- इंद्रसहानी खटल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल 1992
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र पुणे- आरक्षण धोरण,प्रकाशन दिनांक 26.01.2016
- विकासाच्या पाऊलखुणा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागची स्मरणिका दिनांक 14.04.2016
- अर्थ व सांख्यिकी संचालनालय,नियोजन विभाग ,महाराष्ट्र शासन मुंबई,महाराष्ट्रातील दलितवस्ती सर्वेक्षण-2001 अहवाल.
- अर्थ व सांख्यिकी संचालनालय,नियोजन विभाग ,महाराष्ट्र शासन मुंबई, सहावी आर्थिक गणना अस्थायी निष्कर्ष सप्टेंबर 2014.
- केंद्रीय अनुसूचीत जाती आयोग, केंद्रीय अनुसूचीत जनजाती आयोग,व केंद्रीय इतर मागास वर्ग आयोग (www.ncbc.nic.in)याच्या वेबसाईटवरील माहिती.
- गर्गे स.मा.-भारतीय समाज विज्ञान कोष खंड 4 संचालक समाज विज्ञान मंडळ पुणे-4,1991
- गर्गे स.मा.-भारतीय समाज विज्ञान कोष खंड 5 संचालक समाज विज्ञान मंडळ पुणे-4,1991
- भोळे, देशपांडे , भारताचे शासन आणि राजकारण, पिपळापुरे ऍण्ड पब्लिशर्स नागपूर 1988
- साप्ताहिक साधना,शेतकरी आत्महत्या आणि कृषीक्षेत्रापुढील आव्हाने विषयावर अंक,सदाशिव पेठ पुणे- 30
- दि.04.10.2008-साप्ताहिक साधना,सदाशिव पेठ पुणे-30 दिनांक 08.09.2001, वसंत पळशीकर यांचा लेख.
- प्रशासकीय न्यायाधीकरण मंबई येथे रिट याचिका क्र.8452/2004 व 470/2005 मधील मधील टि ए क्र.1 / 2014 व 2/2014 मध्ये दिनांक 28.11.2014 रोजीचा निर्णय




ISSN - No. 2319-9318

*Peer Reviewed International Research Journal*

# VIDYAWARTA

## *Special Issue.*

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

267

# Arts,Commerce and Science College, Ashti

Tal.Ashti, Dist.Beed (MS)

Accredited by NAAC B++ Grade with 2.78 CGPA,
ISO 9001:2015, Green Audited College



## Interdisciplinary National Conference on

## Recent Trends in Social Sciences & Commerce

27th February 2018

# PUBLIC ADMINISTRATION & POLITICAL SCIENCE

Organizer

268

issue of the journal provides an opportunity to the academicians, consultants, olars, Researchers and Policy makers with variety of backgrounds and eriences to exchange their views on the concerned topics. The papers on cent Trends in Social Sciences and Commerce', share new ideas and research ılts to find solutions on the practical challenges in the encountered areas. The thods, data, information, knowledge and innovative ideas in the papers are fu. for the students, teachers and social workers in the subject of Commerce, ciology, Public Administration, Economics, History and Political Science.









**Publisher & Owner.**
Archana Rejendra Ghodke
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post-Limbaganesh Tq.Dist.Beed.
Pin-431126 (Maharashtra)
Cell. 9850203295

ISSN-2319 9318

Ashish Press, Ashti

| | | | |
|---|---|---|---|
| 48 | Panchayat Raj Institution in India | Dr. Jayram S. Dnawale | 160 |
| 49 | Women And Panchyat Raj Institution | Dr. Suhas R. Morale<br>Mr. Pakkapon Jantaraoj | 164 |
| 50 | Political Development and Modernization | Dr. Vinod V. Bairagi | 167 |
| 51 | Indian's foreign policy and diplomacy with Different Countries for National Interest | Shaikh Gafoor Ahmed | 180 |
| 52 | Women Empowerment | Ranee Jagannathrao Jadhav | 185 |
| 53 | Human Right and Type | Shivaji Gorakshanath Dhokane | 188 |
| 54 | Human Rights in Indian Constitution | Dr. R. K. Kale | 192 |
| 55 | Marginal Status Of Women And Need Of Empowerment - A Review | Prof AnujaA.Kastikar<br>Dr. SangeetaS.Sasane198 | 196 |
| 56 | Womens Human Rights & Women Empowerment | Dr. S.N. Satale | 199 |
| 57 | भारतीय राज्यघटना आणी मानवी हक्क | प्रा.डॉ गालफाडे ए.बी. | 202 |
| 58 | मानवी हक्क आणि जागतीक शांतता | प्रा. डॉ. ढोबळे डी. बी. | 205 |
| 59 | पंडित नेहरूंचे अण्वस्त्र धोरण | प्रा.डॉ.माधव कदम | 208 |
| 60 | महिला सबळीकरणामध्ये प्रशासनाची भूमिका | डॉ. नामानंद गौतम साठे | 214 |
| 61 | जी एस टी (वस्तु व सेवा कर) आणि राज्या समोरील अव्हाने | डॉ.साहेब साठेड<br>गणेश मारोती कचरे | 217 |
| 62 | मानवी हक्क व नैतिकता | प्रा. डॉ. अनिल दत्तू देशमुख | 219 |
| 63 | पंचायतराज व्यवस्था आणि ग्रामपंचायतीतील महिला आरक्षण | काळे आर.के. | 222 |
| 64 | विविध क्षेत्रांतर्गत महिलांचे सबलीकरण | प्रा. सतिश मैलारी कटके | 226 |
| 65 | मानवी हक्कांची समीक्षा | डॉ. खडके ज्ञानेश्वर सुखदेव | 231 |
| 66 | मानवी हक्क : स्वरुप व स्वयंसेवी संस्था | प्रा. डॉ. महेश मोटे | 233 |
| 67 | महिला सबलीकरण | प्रा. डॉ. शिवाजी गोविंदराव दिवाण | 238 |
| 68 | मानव अधिकार आणि भारताची भूमिका | प्रा.डॉ.मुंडे एम.आर. | 241 |
| 69 | भारतातील पंचायतराज पद्धत | प्रा.डॉ. पोकळे के.जी. | 244 |
| 70 | शितयुध्दोत्तर काळात भारताचे परराष्ट्र धोरण | प्रा.डॉ. रामकिशन लोमटे | 248 |
| 71 | मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना | प्रा.ज्ञानेश्वर बनसोडे डॉ. महादेव गव्हाणे | 251 |
| 72 | [illegible] | | |


266
269

# भारतातील पंचायतराज पद्धत

प्रा.डॉ. पोकळे के.जी.
संशोधन मार्गदर्शक
विभाग प्रमुख -राज्यशास्त्र विभाग
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा.

**प्रस्तावना :**

पंचायत राज संस्थाची स्थापना म्हणजे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने उचललेल्या महत्वपुर्ण पावालापैकी एक अत्यंत महत्वाचे पाऊल होय. सर्वांगीन ग्रामीण विकास जनतेच्या स्वतःच्या इच्छेप्रमाणे तिच्याच सहकार्याने व लोकशाही मार्गाने घडवून आणण्यासाठी पंचायत राज संस्थाची स्थापना करण्यात आली. पंचायत राज म्हणजे ग्रामीण व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये भारताने केलेला एक अनन्य साधारण व नावीन्यपुर्ण प्रयोग आहे.

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत भारताची पंचायत राज व्यवस्था संपूर्ण जगाचे आकर्षण ठरली आहे. या देशावर अनेक परकीय आक्रमण झाली. परंतु खेडी ही स्वयंपुर्ण व अभेद्य राहिली. हजारो वर्षापासुन भारतात खेडयांचा कारभार खेडयातील लोकच पाहत असत. गावाचा कारभार चालविण्याचा अशा ग्रामीण संस्थेला पंचायत राज असे संबोधले जात होते.

पंचायत राज या शब्दाचा अर्थ पाच व्यक्तींचे मंडळ खेडयाचा कारभार बघत असे, आणि याच पाच व्यक्तीचा निर्णय अंतिम समजला जात असे. समाजात या पाच व्यक्तींना मानाचे स्थान प्राप्त झालेले होते. या व्यक्तींना गावाच्या संदर्भात घेतलेला कोणताही निर्णय एकमुख मानला जात असे.

खेडयातील अनुभवी चारित्र्यशील आणि वयाने ज्येष्ठ असलेले एकत्र बसुन गावातील तंटे सांमजस्याने सोडवीत असत. कोणावरही अन्याय होणार नाही याची काळजी घेतली जात होती. बनवेगिरीला व खोटेपणाला वावच नव्हता त्यामुळे न्यायदानावर सर्वच लोकांचा विश्वास होता. गावातील लोक गावाचे संरक्षण स्वतःच करत होते. हे गाव माझे आहे अशी भावना त्यांच्या मनात रुजलेली होती. एकुणच खेडयात नव्हे तर संपुर्ण भारतात शांतता व स्थैर्य निर्माण करण्यात पंचायत राज संस्थेचा मोठा वाटा राहिला आहे. म्हणुन असे म्हटले जाते की, भारतातील खेडे ही आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय दृष्टीने बलशाली व स्वयंपुर्ण होती. ७० टक्के जनता ग्रामीण भागात वास्तव्य करतात तसेच या जनतेचा मुख्य व्यवसाय शेती आहे. जोपर्यंत शेतकरी, खेडेगाव यांचा विकास होत नाही तोपर्यंत भारताचा विकास होत नाही. म्हणुनच पंचायत व्यवस्थेमार्फत ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास घडुन आणणे हे शासनाचे प्रमुख ध्येय राहिले आहे.

खेडयातील लोकांचे संबंध एकमेकांशी अतिशय जिव्हाळयाचे होते. सामाजिक कार्यात लोकाचा मोठा सहभाग असायचा गावातील पाणी प्रश्न, रस्ता दुरुस्ती, गावातील सांडपाणी, हे कार्य सर्व गावकरी एकत्र येऊन करत असत. गावाचा कारभार सरळ आणि स्वच्छ पद्धतीने करत होते. गावासाठी लोक निस्वार्थपणे काम करायचे. इतर कोणत्याही बाबीकरीता गावातील पंचलोक स्वशासनाची जबाबदारी पार पाडत होते, हे मात्र खरे.

म्हणजेच यावरुन असे स्पष्ट होते की, प्राचीन काळापासून पंचायत राज हि संस्था अलिखीत स्वरुपाची परंतु आधिनिक काळाला योग्य मार्गदर्शन दाखविणारी ठरली आहे हे विसरता येणार नाही.

**'पंचायत राज' विविध अभ्यास समित्या :-**

**१) बलवंतराय मेहता समिती :-**

१९५६ मध्ये केंद्रशासनामार्फत बलवंतराव मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. २४ नोव्हेंबर १९५७ रोजी समितीने आपला अहवाल सादर केला. या अहवालात पंचायत संस्थेच्या बळकटी करण्यासाठी अनेक शिफारशी करण्यात आल्या होत्या त्या शिफारशी राष्ट्रीय विकास मंडळाने १२ जानेवारी १९५९ च्या बैठकीत स्विकारण्यात आल्या आणि त्यानुसार राज्य सरकारांना असे सुचविले की त्या शिफारशी स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यक असेल त्यात काही बदल करुन राज्य सरकारने पंचायत राज प्रशासनासंबंधी कायदे करावेत असे महत्वपुर्ण निर्णय केंद्र सरकारने घेऊन पंचायत राज संस्थेत एक सुचना आणण्याचा प्रयत्न केला.

बलवंतराय मेहता या समितीने तीन पातळीवर ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण करण्याचे सुचविले जे की, (१) ग्रामपंचायत, (२) पंचायत समिती, (३) जिल्हा परिषद या त्या तीन संस्था होत. या तीन संस्थांनाच 'पंचायत राज' असे म्हणतात.

१) **ग्रामपंचायतीसाठी शिफारसी :**

ग्रामपंचायत ही संस्था गावाचा कारभार ही गावपातळीवर आपले कार्य पार पाडत असते म्हणुन ही संस्था अतिश महत्वाची आहे.[1] गावातील सर्व लोकांनी म्ळणेच मतदारांनी ग्रामसभा निर्माण करावी.[3] ग्रामसभे मार्फत गावातील ग्रामपंचायतीत निवडणुकीच्या मार्गाने प्रतिनिधी निवडण्यात येईल.

२) गावातील सर्वच कारभार या पंचायतीमार्फत चालवीला जावा.

३) पंचायत सचिव म्हणजेच ग्रामसेवक हा ग्रामपंचायतीचा शासकीय सेवक म्हणुन कार्य करेल.

४) स्थानिक स्तरावरील कर जमा करुन तसेच शासकिय अनुदानातून ग्रामपंचायत गावाच्या सर्वांगीण विकासासाठी खर्च करेल अशी तरतुद करण्यात आली.

५) ज्या गावची लोकसंख्या किमान ५०० असेल त्या प्रत्येक गावासाठी एक ग्रामपंचायत असेल.

६) ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या २-३ गावाचा गट करुन त्या ठिकाणी ग्रुप ग्रामपंचायत स्थापन करण्यात यावी.

७) तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीची सदस्य संख्या ५ व जास्तीत जास्त ९ असावी यापैकी एक सरपंच असेल या सदस्या किमान एक महिला असावी.

२) **पंचायत समितीसाठी शिफारशी :**

१) या संस्थेत तहसिल किंवा विकास गटाच्या पातळीवर जवळपास १०० खेडयाच्या विकास गटात पंचायत समिती असे नाव देण्यात यावे.

२) ही समिती ग्रामपंचायतींनी अप्रत्यक्षपणे निवडावी.

३) या समितीवर गटाच्या क्षैत्रात काम करणाऱ्या नगरपालिकांना व सहकारी संस्थाना प्रतिनिधीत्व देण्यात यावे.

४) या पंचायत समितीमध्ये जे सदस्य असतील त्या सदस्याची निवड अप्रत्यक्षपणे करण्यात यावी, म्हणजेच त्या त्या ग्रामपंचायतीच्या सदस्याकडून पंचायत समितीच्या सदस्याची निवड करण्यात यावी.

३) **जिल्हा परिषदेसंबंधी शिफारशी :**

१) राज्यतील जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद नावाची एक समिती स्थापन करण्यात यावी.

२) या जिल्हा परिषदेत पंचायत समितीचे अध्यक्ष, जिल्हयातील लोकसभा-विधानसभा सदस्य विकास खात्यातील जिल्हा पातळीवर काम करणारे सर्व अधिकाारी यांचा या परिषदेत समावेश करण्यात यावा.

३) जिल्हा परिषदेने आपल्या विभागातील पंचायत समितीचे अंदाजपत्रक मंजुर करावे.

४) शासकीय अनुदानाची विकास गटामध्ये विभागणी करुन त्यांच्या योजनामध्ये एकसुत्रता आणुन पंचायत समितीच्या कामकाजात मार्गदर्शन करावे.

वरीलप्रमाणे बलवंतराव मेहता समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्रात पंचायत राज संस्थेची स्थापना करण्यात आली. १ मे १९६७ रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. तसेच मेहता समितीच्या शिफारसीचा अभ्यास करण्यासाठी वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली २७ जुन १९६० रोजी एक समिती गठीत करण्यात आली.

तसेच जिल्हा प्रश्नविषयक बाबीसाठी आणि सत्तेचे जास्तीत जास्त विकेंद्रीकरण घडवून आणण्यासाठी नियोजन आयोगाने श्री. व्ही.व्ही. कृष्णम्माचारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितीने आपला अहवाल १७ ऑगस्ट १९६२ ला सादर केला. या समितीने प्रमुख अशी शिफारस केली होती की ग्रामीण विकास जलद गतीने व्हावा यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण करुन पंचायत राज व्यवस्था अधिक मजबुत करावी.

**जैन समितीचा अहवाल :**

प्रशासकीय सुधर आयोगा मार्फत पंचायत राज सुधारणेसाठी व सत्तेचे विकेंद्रीकरण करुन लोकशाही व्यवस्था अधिक मजबुत करण्यासाठी १७ जुलै १९६६ रोजी श्री. तखतमल जैन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली या समितीलाच जैन समिती असे संबोधले होते.

**अशोक मेहता समितीच्या शिफारशी :**

१२ डिसेंबर १९७७ मध्ये भारत सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक बळकटी आणण्यासाठी अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीने पंचायतराज व्यवस्थेचे अवलोकन करुन १९७८ मध्ये शासनास आपला अहवाल सादर केला. या अहवालात मेहता समितीने पंचायत राज व्यवस्थेच्या बळकटी करणासाठी १३२ शिफारशी सुचविल्या.

271

**राव समितीच्या शिफारशी :**

२५ मार्च १९८५ मध्ये श्री. जी. व्ही.के. राव यांच्या अध्यक्षने खाली या समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने नोकरशाही व्यवस्थेच्या भरवशावर आर्थिक विकास व सामाजिक न्यासाचे उद्दिष्ट पुर्ण होऊ शकत नाही. हे उद्दिष्ट पुर्ण करायचे असेल तर त्यासाठी पंचायत राज संस्थेच्या माध्यमाने जनतेच्या विकास कार्यात सहभाग घेणेआवश्यक आहे अश महत्वपुर्ण शिफारस केली. २८ डिसेंबर १९८५ ला आपला अहवाल सादर केला.

तसेच एल.एम. सिंघवी समिती १९८६ मध्ये पंचायत राज विकासासाठी गठीत करण्यात आली.

वरीलप्रमाणे अनेक समित्याने आपआपल्या शिफारशी पंचायतराज या संस्थेसाठी केल्या.

**७३ वी घटना (संविधान) दुरुस्ती :**

देश पातळीवर २ ऑक्टोबर १९५९ रोजी पंचायत राज व्यवस्थेस सुरुवात झाली. सत्तेचे जास्तीत जास्त विकेंद्रीकरण करणे हा पंचायत राज व्यवस्थेचा मुळ उद्देश होता. यासाठी अनेक समित्याचे गठन करण्यात आले. त्या समित्यांनी योग्य अध्ययन करुन पंचायतराज व्यवस्थेतील दोष शोधून आपल्या शिफारशी शासनास सादर केल्या. या समित्यामध्ये बलवंतराय मेहता समिती, अशोक मेहता समिती, राव समिती, आणि एम.एल. सिंघवी अतिश्य महत्वाच्या मानल्या गेल्या. या समितींनी केलेल्या शिफारशीच्या आधारावर पंचायत राज व्यवस्थेची विकासात्मक वाटचाल सुरु झाली. या संस्थेस घटनात्मक स्थान प्राप्त करुन देण्यासाठी राजीव गांधी काळातही प्रयत्न झाले. परंतु त्या प्रयत्नांना यश प्राप्त झाले. नाही. मात्र पी.व्ही. नरसिंहराव पंतप्रधान असताना या प्रयत्नांना ७३ व्या संविधान दुरुस्तीद्वारे घटनात्मक स्थान प्राप्त झाले.

**जिल्हा परिषद :**

स्थानिक नेतृत्वाचा विकास, ग्रामीण पातळीवर लोकशाही दृढ करणे, नियोजीत विकास कार्यासाठी पैशाची तरतुद करणे व सर्वसाधारण लोकांना सामुहिक विकासाच्या कार्यात रस घेण्यासाठी प्रेरीत करणे यासारख्या उद्दिष्टांच्या पुर्तीसाठी जिल्हा परिषद स्थापन करण्यात आली.

महाराष्ट्र सरकारने जिल्हा परिषदांना स्थानिक लोकांच्या हितासाठी विकास कार्यात अमर्याद अधिकार दिले आहेत. या जिल्हा परिषद जरी आपल्या कार्यात स्वतंत्र व स्वायत्त असल्या तरी त्यांना सरकारने एकंदर घोषीत केलेल्या उद्दिष्टांच्या व धोरणांच्य मर्यादेतच कार्य करावे लागते. सरकारच्या नियमात व धोरणात कोणत्या प्रकल्पांना व कार्यांला प्राधान्य द्यावे हे स्थानिक नेत्यांना ठरविण्याचा अधिकार आहे. महाराष्ट्र राज्यात ३८ जिल्हे आहेत प्रत्येक जिल्हयासाठी जिल्हा परिषद असावी अशी तरतुद आहे परंतु मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे नागरी वस्तीचे जिल्हे आहेत म्हणुन महाराष्ट्रात एकुण ३३ जिल्हा परिषदा आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ कायदा समन करुन १ मे १९६७ ला महाराष्ट्रात जिल्हा परिषदेची स्थापना झाली.

**पंचायत समिती :**

पंचायत राज संस्थेच्या त्रिस्तरीय व्यवस्थेतील तालुका स्तरावर काम करण्यासाठी संस्था म्हणजे पंचायत समिती होय. ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद यांच्यातील महत्वाचा दुवा म्हणुन पंचायत समिती कार्य करीत असते. महाराष्ट्र राज्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कायद्यातील कलम ५६ नुसार पंचायत समितीची स्थापना करण्यात आली. ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर झालेल्या बदलामुळे पंचायत समिती देखील स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले आहे.

पंचायत समितीच्या सभापती त्या समितीचा प्रमुख असतो प्रमुख या नात्याने सभापतीस अनेक कार्य पार पाडावी लागतात.

**गटविकास अधिकारी :**

पंचायत समितीच्या कार्यकारी प्रमुख आणि सचिव म्हणुन गटविकास अधिकारी कामकाज पाहत असतो. या गटविकास अधिकाऱ्याची नियुक्ती राज्यशासनाकडुन केली जाते अथवा जिल्हा परिषदे अंतर्गत वर्ग २ मधील विस्तार अधिकाऱ्यामधुन पदोन्नती देऊन गटविकास अधिकारी नियुक्त केला जाऊ शकतो. गटविकास अधिकाऱ्यांच्या मार्फत राज्यशासन पंचायत समितीवर नियंत्रण ठेवु शकतो. राज्य शासन आणि पंचायत समिती यांच्यामधील दुवा म्हणुन गटविकास अधिकारी कामकाज बघत असतो.

**ग्रामपंचायत :**

अतिप्राचीन काळपासून ते आजपर्यंत प्रत्येक गावाचा कारभार ग्रामपंचायती मार्फत चालत आला आहे. भारता हा कृषीप्रधान देश आहे आणि या देशाची अर्थ व्यवस्था ग्रामीण भागावरच अवलंबुन असते म्हणुन देशातील ग्रामपंचायतींना अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. गावातील सामाजिक प्रश्न, समस्या सोडवण्याचे कार्य ग्रामपंचायत करत असते. देशातील प्रत्येक

ISSN – 2319 9318

ग्रामपंचायतीत आज कायदेशीर आधार प्राप्त झाला आहे. ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर ग्रामपंचायतीना घटनात्मक स्थान प्राप्त झाले आहे.

केंद्र राज्यशासन व जिल्हा परिषद यांच्या विविध विकास योजना ग्रामीण लोकांपर्यंत पोहचविणारी लोकशाही विकेंद्रीकरणातील तसेच गावपातळीवरील सर्वसामान्य लोकाचां विकास घडवून आणणारी ग्रामपंचायत अतिशय महत्वाची आहे.

**ग्रामपंचायतीची स्थापना :**

राज्यात ग्रामपंचायत स्थापन करण्याचा अधिकार राज्यशासनाला आहे. महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये एक कायदा करुन १९५८ सालच्या ग्रामपंचायतीच्या कायद्यात दुरुस्त्या केल्या. महाराष्ट्र राज्या दुरुस्त कायदा २४ एप्रील १९९४ पासुन आंमलात आला.

ग्रामपंचायतीचा प्रशासकीय अधिकारी म्हणुन काम पाहणारा सरकारी कर्मचारी हा ग्रामसेवक असतो. ग्रामसेवक हा ग्रामपंचायतीचा सचिव असतो. तर तो जिल्हा परिषदेचा सेवक म्हणुनही असतो.

सरपंच-उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य यांच्यामार्फत प्रशासन कार्यक्षम ठेवता येते. परंतु कार्यक्रमाची अंमलबजावणी नोकरशाही करते. पदाधिकारी त्यावर केवळ नियंत्रण आणि लक्ष ठेवून असतात. ग्रामपंचायतीचा कारभार पाहण्यासाठी ग्रामसेवकाची नेमणुक केलेली असते.

**ग्रामसभा :**

पंचायत राजव्यवस्थांमध्ये कनिष्ठ स्तरावर ग्रामसभा आपले कार्य करीत असते. ग्रामसभेला पंचायत राज्य व्यवस्थेचा आधार मानण्यात आला आहे. ग्रामसभेची किमान दर तीन महिन्यानी बैठक झाली पाहिजे. प्रजासत्ताक दिन, कामगार दिन, स्वातंत्र्य दिन आणि गांधी जयंती या दिवशी ग्रामसंस्थाचे आयोजन केले जाते.

**निष्कर्ष :**

पंचायत राज संस्था म्हणजे ग्रामीण व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये भारताने केलेला एक अनन्य साधारण व नाविण्यपुर्ण प्रयोग आहे. राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण यांनी अत्यंत दुरदृष्टी आणि व्यापक विचार करुन या राज्याच्या सामाजिक, सांस्कृतिक राजनैतिक जिवनाला अनुरुप अशा पंचायत राजपद्धतीच्या अंमल बजावणीसाठी आपल्या मंत्रीमंडळातील एक जेष्ठ व अनुभवी सदस्य म्हणुन महसुल मंत्री मा. वसंतरावजी नाईक यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही विकेंद्रीकरणाची स्थापना करुन राज्यात जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद, तालुका स्तरावर पंचयात समिती आणि खेडयात ग्रामपंचायती निर्माण केल्या व सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी पंचायतराज ही संस्था कार्यरत केली.

**संदर्भ ग्रंथ :**


१) महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण
प्रा. डॉ. अशोक नाईकवाडे, प्रा. डॉ. पंडीत नलावडे

२) पंचायत राज आणि नागरी प्रशासन
प्रा. डॉ. अर्जुनराव दर्शनकार

३) प्रा.के.आर.बंग
महाराष्ट्र शासन व राजकारण

४) तौलनिक राज्यशास्त्र
(संपादक प्रा. सुरेश भालेराव)

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Vidyawarta UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

# Vidyawarta®

Issue-21, Vol-13, Jan. to March 2018

International Multilingual Research Journal

272

6th ANNIVERSARY

Editor
Dr.Bapu G.Gholap

13) Re-reading GithaHariharan's When Dreams Travel:A Feminist approach
ROSHNI C.,Kaliyikkavilai, TN || 58

14) IDENTIFICATION OF DIGITAL RESOURCES
S. NAGARAJU, Hyderabad || 62

15) Rethinking the Essentials of Higher Education Reforms in India
Lt. (Dr.) Pravesh Kumar—Noor Aisha, RAMPUR || 66

16) Human Development in South Korea: 1945-1992
Nawnit Kumar, New Delhi || 71

17) BARRIERS OF PEACE EDUCATION: PSYCHOLOGICAL, CULTURAL & POLITICAL
Mosira Parvin, Nadia, West Bengal || 77

18) AGRO TOURISM IN MAHARASHTRA
Dr. B. G. Lobo, Akurdi, Pune || 84

19) Synthesis of Some Novel Chalcone Containing Pyrazole Moiety
Prashant.G. Kumdale, Latur || 89

20) मराठवाडयातील जिल्हा परिषदेच्या राजकारणात महिलांचा राजकीय सहभाग:एक अभ्यास
प्रा. डॉ. पोकळे के. जी., चौसाळा, ता.जि.बीड. || 92

21) माहिती लेखापरीक्षण
प्रा.भगवान रा.डोके, वाळुज, औरंगाबाद || 95

22) भारतातील स्त्रीया आणि प्रौढ शिक्षण
प्रा. डॉ. आनंद माधवराव वाघ-बानाटे चंद्रमा सुधाकर, औरंगाबाद || 98

23) पंचायत राज व्यवस्थेतील महिला आरक्षण व घटनात्मक तरतुदी
प्रा.डॉ.सुनंदा वामनराव ठाकरे-राखी रविंद्र घरटे || 101

24) 'संयुक्त महाराष्ट्राची आधुनिकतेकडून अत्याधुनिकतेकडील वाटचाल':एक संक्षिप्त अध्ययन
प्रा. डॉ. शुभांगी राठी-प्रा. दिलीप हरसिंग राठोड, जि. जळगांव || 105

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com